# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

## जाहिर प्रगटन

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद च्या २०१६ ते २०२१ या पाच वर्षीय शैक्षणिक वर्षासाठी तयार केलेल्या बृहत आराखडयामध्ये दर्शविल्याप्रमाणे **शैक्षणिक वर्ष २०१६-१७** साठी **डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या** अधिक्षेत्रात नवीन महाविद्यालय / परिसंस्था सुरु करणेसाठी तसेच **शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७** साठी संलग्नीत असलेल्या महाविद्यालयामध्ये आणि मान्यताप्राप्त परिसंस्थामध्ये नवीन विषय/अभ्यासक्रम नवीन विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी, विद्यार्थी संख्या वाढ/ सेकंड शिफ्ट, नैसर्गिक विस्तार, कायम संलग्नीकरण, संलग्नीकरणाचे नुतनीकरण/ तुकडी नुतनीकरण इत्यादींचे अर्ज दिनांक **३१ ऑक्टोंबर,२०१५** पर्यंत ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यासाठी विद्यापीठातर्फे जाहिर आवाहन करण्यात येत आहे.

उपरोक्त नमुद केलेले अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यासाठी विद्यापीठाच्या www.bamu.ac.in या संकेतस्थळावर Homepage वरील Affiliation Portal OAASIS या Link वर Click करुन Proposal Guidelines **२०१६-१७** येथे Click करुन त्यातील सुचनेनुसार ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावेत. आपल्या माहितीसाठी सदर ठिकाणी helpline देण्यात आलेली आहे. तसेच शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, विद्यापीठाचा बृहत आराखडा, संलग्नता शुल्काचा तक्ता, प्रक्रिया आदि शुल्काचे परिपत्रक व इतर सविस्तर माहिती आणि संबधीत परिपत्रके Important G.R./Circulars वर देण्यात आलेली आहे.

०१. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम ८२(३) व शासन निर्णय ३० ऑक्टोंबर, २०१०, ०२ एप्रिल २०१२, व ०२ सप्टेंबर २०१३ अन्वये विहित केलेल्या नियमानुसार एका वर्षापुर्वीच्या नोंदणीकृत शैक्षणिक संस्थांनी दिनांक ३१ आक्टोबर २०१५ पर्यंत कार्यालयीन वेळेत अर्ज सादर करावेत.

०२. विद्यापीठ बृहत आराखडयामध्ये निर्धारीत केलेल्या अभ्याक्रम व ठिकाण निहाय विहित केलेल्या शुल्कासह Online अर्ज करणे अनिवार्य राहिल तसेच अपुर्ण शुल्क व अपुर्ण अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत.

०३ शैक्षणिक वर्ष **२०१६-२०१७** करीता बृहत आराखडयातील पृष्ट क्रमांक **३३ ते ३७** मध्ये नमुद केलेल्या अभ्यासक्रम व ठिकाणासाठीच अर्ज सादर करण्यात यावेत.

०४. एन.सी.टी.ई., ए.आय.सी.टी.ई. बार कौन्सिल ऑफ इंडिया, कौन्सिल ऑफ ऑर्किटेक्चर, फॉर्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, आर.सी.आय आणि इत्यादी केंद्रीय प्राधिकरणाची मान्यता आवश्यक असणाऱ्या अभ्यासक्रमासाठी नियमामध्ये विहित केल्यानुसार विद्यापीठात तसेच संबधीत प्राधिकरणास विहित केलेल्या मुदतीच्या आत स्वतंत्रपणे अर्ज करण्याची जबाबदारी अर्जदार संस्थेची राहिल.

०५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी सध्या संलग्न असलेल्या महाविद्यालयांनी / मान्यताप्राप्त परिसंस्थांनी शैक्षणिक वर्ष **२०१६-२०१७** पासुन **नवीन विषय / अभ्यासक्रम, नवीन विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी, विद्यार्थी संख्यावाढ / सेकंड शिफ्ट** इत्यादीबाबतचे **विस्ताराचे** विहित नमुन्यातील अर्ज विहित मुदतीत ऑनलाईन पध्दतीने भरुन त्याची प्रिंट घेऊन सदर अर्ज **०६ प्रतीत** आवश्यक ते कागदपत्रे , प्रक्रिया शुल्क आदि व संलग्नता शुल्कासह विद्यापीठाच्या संलग्नता विभागात सादर करावेत.

०६. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी सध्या संलग्न असलेल्या महाविद्यालयांनी / मान्यताप्राप्त परिसंस्थांनी शैक्षणिक वर्ष **२०१६-१७** पासुन **नैसगिक विस्ताराचे** विहित नमुन्यातील अर्ज विहित मुदतीत ऑनलाईन पध्दतीने भरुन त्याची प्रिंट घेऊन सदर अर्ज **०६** प्रतीत आवश्यक ते कागदपत्र, प्रक्रिया शुल्क आदि व संलग्नता शुल्कासह विद्यापीठाच्या संलग्नता विभागात सादर करावेत.

०७. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी सध्या संलग्न असलेल्या महाविद्यालयांनी / मान्यताप्राप्त परिसंस्थांनी शैक्षणिक वर्ष **२०१६-१७ पासुन संलग्नीकरणाच्या नुतनीकरणाचे** विहित नमुन्यातील अर्ज विहित मुदतीत ऑनलाईन पध्दतीने भरुन त्याची प्रिंट घेऊन सदर अर्जाच्या **दोन प्रती** आवश्यक ते कागदपत्र, प्रक्रिया शुल्क आदि व संलग्नता शुल्कासह विद्यापीठाच्या संलग्नता विभागात सादर करावी.

०८. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी सध्या संलग्न असलेल्या महाविद्यालयांनी मान्यताप्राप्त परिसंस्थांनी शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासुन **कायम संलग्नीकरणाचे** विहित नमुन्यातील अर्ज विहित मुदतीत ऑनलाईन पध्दतीने भरुन त्याची प्रिंट घेऊन सदर अर्जाच्या **दोन प्रती** आवश्यक ते कागदपत्र, प्रक्रिया शुल्क आदि व संलग्नता शुल्कासह विद्यापीठाच्या संलग्नता विभागात सादर करावी.

०९. शासन निर्णय ०२ सप्टेंबर,२०१३ अन्वये बृहत आराखडया बाहेरच्या ठिकाणासाठी व अभ्यासक्रमासाठी अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

१०. महाविद्यालयाने मान्यतेसाठी ऑनलाईन पध्दतीने सादर केलेले अर्ज तसेच इलेक्ट्रॉनिक पध्दतीने म्हणजेच व्ही.सी.डी. वर नेहमीच्या पध्दतीने हार्डकॉपीसह विद्यापीठाकडे सादर करण्यात यावी. सोबत संस्थेमध्ये असलेल्या सोयी सुविधा व कर्मचारी / शिक्षक यांच्या विषयांचे व्हीडीओ चित्रिकरण सादर करावे.

११. बृहत आराखडयामध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या संशोधन केंद्राच्या ठिकाणासाठी विहित केलेल्या नियमानुसार ३१ ऑक्टोबर २०१५ पर्यंत अर्ज करणे अनिवार्य राहिल. त्यानंतर आलेल्या अर्जाचा स्विकार करण्यात येणार नाहीत.

१२. नवीन प्रस्तावित महाविद्यालयांनी अध्यादेश - १५१ मध्ये निर्धारीत केलेल्या शुल्कानुसार तसेच अस्तित्वात असलेल्या संलग्नीत महाविद्यालयाने संलग्नीकरणाचे नुतनीकरण करण्यासाठी अध्यादेश - १५० मध्ये निर्धारीत केलेल्या शुल्कासह दिनांक ३१ ऑक्टोबर २०१५ पूर्वी On Line अर्ज करणे अनिवार्य राहिल.

१३. दिनांक ३१ ऑक्टोबर २०१५ नंतर अर्ज सादर करणाऱ्या महाविद्यालयांना निर्धारीत केलेल्या शुल्काच्या दुप्पट शुल्क आकारण्यात येईल. तसेच संलग्नीकरण समिती पाठविण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

१४. अस्तित्वात असलेल्या संलग्नीत महाविद्यालयांना पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी अभ्यासक्रमवाढ, विषयवाढ, तुकडीवाढ, नैसगिकवाढ, विद्याशाखावाढ इत्यादी अभ्यासक्रमासाठी अध्यादेश- १५१ मध्ये विहित केलेल्या शुल्कासह विस्तारीकरणांतर्गत सादर करणे अनिवार्य राहिल.

१५. बी.सी.ए., बी.बी.ए., बी.एस्सी.(संगणकशास्त्र), बी.सी.एम., एम.सी.एम., बी.बी.एम., बी.लिब, एम.लिब, बी.एम.सी.जे., एम.एम.सी.जे., बी.एस.डब्ल्यु. एम.एस.डब्ल्यु. इत्यादी अभ्यासक्रम स्वतंत्रपणे चालविणाऱ्या महाविद्यालयांनी तुकडीवाढ करीता विस्तारीकरणांतर्गत कला,वाणिज्य व विज्ञान अभ्यासक्रमासाठी अर्ज सादर करु नये.

१६. अस्तित्वात असलेल्या सर्व संलग्नीत महाविद्यालयांनी तसेच प्रस्तावित नवीन महाविद्यालयांनी बृहत आराखडयांची प्रत प्रकाशन विभागाकडून अर्जासोबत खरेदी करणे अनिवार्य राहिल. बृहत आराखडयाच्या प्रती सोबत ऑन लाईन रजिष्ट्रेशन करीता शुल्क स्वतंत्रपणे भरल्यानंतर Login ID व Password शैक्षणिक विभागाकडून प्राप्त करुन घेतल्यानंतरच पुढील कार्यवाही करता येईल.

१७. सदर अर्जापैकी आपणास लागु असलेल्या अर्जाची माहिती आपण ऑनलाईन प्रणालीव्दारे भरावी व त्याची A-४ साईज पेपरवर एकाच बाजुने प्रिंट घेऊन (परिपत्रकात नमुद केलेल्या प्रतीत) त्यासोबत आवश्यक ते कागदपत्र, सहपत्र, विहित केलेले संलग्नता शुल्कासह अर्ज वेळापत्रकाप्रमाणे सादर करावा. या परिपत्रकाव्दारे जमा करण्यात येणारे शुल्क कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचे नांवे **बॅंक ऑफ महाराष्ट्र (खाते क्र. ६०१४५३३०३२३) किंवा** बॅंक ऑफ महाराष्ट्र शाखा क्र. १५२, IFSC Code No. MAHB००००१५२ येथील (**खाते क्र. ६०१४५३३०३२३**) या क्रमांकावर आर.टी.जी.एस. (R.T.G.S.) व्दारे जमा करुन चलानाची प्रत प्रस्तावासोबत जोडावी.

(प्राध्यापक. डॉ. के.व्ही. काळे)
संचालक,
महाविद्यालये व विद्यापीठ
विकास मंडळ

विद्यापीठ प्रांगण. ][
औरंगाबाद - ४३१ ००४. ][
संदर्भ क्र. शैक्ष/संलग्न/प्रगटन/२०१५-१६ - 4391 ][
दिनांक : १४-१०-२०१५ ][